# महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी सहकारी पतसंस्था (मर्यादित), मुंबई

## मध्य-मुदत व तातडीचे कर्ज नियमावली

१. नवीन सभासदत्व स्विकारलेल्या सभासदास ३ महिन्यानंतर फक्त तातडीचे कर्ज मिळू शकेल.त्यानंतर व सभासदत्वाच्या पुढील १ वर्षाच्या कालावधीत रू.५,००,०००/- पर्यंतचे मध्य-मुदत कर्ज मिळू शकेल.सभासदत्वास १ वर्ष पूर्ण झाल्यानंतर सहकार खात्याने ठरवून दिलेल्या वेतनानुसारच्या कर्जसारणीनुसार कर्ज मिळेल.एकूण कर्ज मर्यादेमध्ये तातडीचे कर्ज अंतर्भूत असेल.**(माहीतीकरीता सारणी मागील पानावर नमूद केलेली आहे.)**

२. मध्य-मुदत कर्जावरील व्याजदर द.सा.द.शे.१०% व तातडीच्या कर्जावरील व्याजदर द.सा.द.शे.८.५% राहिल.

३. मध्य-मुदत कर्जाची परतफेड किमान ६ व कमाल २४० समान मासिक हप्त्यांत व तातडीच्या कर्जाची परतफेड किमान ३ व कमाल १२ समान मासिक हप्त्यांत करता येईल.(शिल्लक सेवानिवृत्ती कार्यकाळास अधीन राहून)

४. रू.५,००,०००/- पर्यंतच्या कर्ज अर्जासोबत रू.१००/- चा रू.५,००,००१/- ते रू.१०,००,०००/- पर्यंतच्या कर्ज अर्जासोवत रू.२००/- चा १०,००,००१/- व त्यावरील कर्जासाठी रू.३००/- चा कर्ज करार दयावा लागेल.

५. रू.१५ लाखाच्या आतील मध्य-मुदत कर्जास रू.२००/- व रू.१५,००,००१/- वरील मध्य-मुदत कर्जासाठी रू.५००/- इतका सर्व्हीस चार्ज आकारण्यात येईल.तातडीच्या कर्जासाठी रू.१००/- इतका सर्व्हीस चार्ज आकारण्यात येईल.

६. कर्ज व व्याज परतफेडीनंतर सभासदाच्या हाती एकूण वेतनाच्या १/४ निव्वळ वेतन मिळेल इतकेच कर्ज मंजूर होईल.

७. कर्ज अर्जासोबत अर्जदाराची मागील ३ महिन्यांची वेतनपत्रके तसेच जामीनदारांचे मागील एक महिन्याचे वेतनपत्रक जोडावे लागेल. प्रत्येक जामीनदाराच्या हाती एकूण वेतनाच्या ४०% निव्वळ वेतन येणे आवश्यक राहिल.

८. रू.५ लाखांपर्यंतच्या कर्जासाठी **१ जामीनदार** व रू.५,००,००१/- ते रू.१०,००,०००/- लाखापर्यंत कर्जासाठी **२ जामीनदार**, रू.१०,००,००१/- ते रू.१८,००,०००/-पर्यंत **३ जामीनदार** व त्यापुढील कर्जासाठी **४ जामीनदार** आवश्यक राहतील. जामिनदार हा पुर्वी ३ पेक्षा जास्त कर्ज प्रकरणांस जामीन नसावा .

९. अन्य पतसंस्थेचे सभासदत्व असल्यास त्या पतसंस्थेचे कर्ज नसल्याचे प्रमाणपत्र जोडावे लागेल तसेच तेथे कर्ज असल्यास शिल्लक कर्जाचा दाखला दयावा लागेल व नियमित परतावा केल्याच्या दाखल्यानुसार ते कर्ज पतसंस्थेच्या कर्ज रकमेतून वळते करून उर्वरीत रक्कम सभासदास देण्यात येईल.सभासदांच्या नावे एकापेक्षा जास्त पतसंस्थांचे कर्ज असल्यास अन्य पतसंस्थांची कर्ज रक्कम सभासदाला कर्ज मागणी अगोदर भरून कर्ज खाते निरंक करावे लागेल.

१०.मध्य-मुदत कर्ज घेतेवेळी जर तातडीचे व आत्मनिर्भर कर्ज शिल्लक असेल तर तातडीचे कर्ज वळते करून घेण्यात येईल परंतु आत्मनिर्भर कर्ज शिल्लक असल्यास ते कर्ज स्वतंत्ररित्या सुरू ठेवण्याची मुभा राहिल.

११. मध्य-मुदत कर्ज घेतेवेळी एकूण कर्ज रकमेच्या १०% इतके भाग भांडवल, तसेच मृत्युंजय योजना मुद्दल खाती रू.८,०००/- व मृत्युंजय योजना व्याज खाती रू.७,०००/- इतकी रक्कम पतसंस्थेत जमा असली पाहिजे.सदर रक्कमा जमा नसल्यास / कमी जमा असल्यास आवश्यक रक्कमा मंजुर कर्ज रकमेतून वसूल करण्यात येतील.

१२. तातडीच्या कर्जाचे ३ हप्ते व मध्य-मुदत कर्जाचे ६ हप्ते मासिक वेतनातून वसूल झाल्यानंतरच कर्जाची परतफेड अंशतः अथवा पुर्णतः करता येईल.तसेच तातडीच्या कर्जाचे ३ हप्ते व त्या मध्य-मुदत कर्जाचे १२ हप्ते (पुर्ण वर्ष) मासिक वेतनातून वसूल झाल्याशिवाय नवीन कर्ज घेता येणार नाही.

१३. मध्य-मुदत कर्जास मागणी करताना भविष्यनिर्वाह निधीस ज्या वारसदाराची नोंद आहे त्याच वारसदाराची पतसंस्थेत नोंद असावी. नसल्यास मध्य-मुदत कर्जास मागणी करतेवेळी त्याची अगोदर पूर्तता करावी.

१४. कर्जाची व व्याजाची वसुली सलग ३ हप्त्यांत न झाल्यास थकीत कर्ज व व्याजाची वसुली प्रमाणित पध्दतीने सहकार कायदयास अधीन राहुन जामीनदारांच्या वेतनातुन करण्यात येईल.कर्जाची परतफेड नियमित अथवा पूर्ण होत नसल्यास जामीनदारांना नोटीसद्वारे सूचित करण्यात येईल व त्यानंतर थकबाकी वसूली चालू करण्यात येईल.

१५. मध्य-मुदत कर्जास अर्ज करताना सर्व कागदपत्रांची पूर्तता करून अर्ज मासिक सभेच्या आधी पाठवण्याची जबाबदारी सभासदाची राहिल.मासिक सभेत कर्ज मंजूर झाल्यावर प्रतिक्षा यादीप्रमाणे कर्ज वितरण करण्यात येईल.प्रतिक्षा कालावधी हा पतसंस्थेला चारही कंपनीकडून मिळणाऱ्या वसुली रकमेवर आधारीत असल्याने ५ लाखापर्यंत किमान १५ दिवस व त्या पुढील कर्ज रकमेच्या मागणीकरीता किमान ३० दिवस प्रतिक्षा कालावधी राहील.

१६. वरील नियमावलीत आवश्यकतेनुसार बदल करण्याचा अधिकार संचालक मंडळास राहील.

**वरील सर्व नियम,अटी व शर्ती मी वाचले असून मला ते मान्य आहेत व त्यामुळे सदर कर्जाबाबत होणाऱ्या कार्यवाहीस मी बांधील आहे.**

**सही ः** ______________________

**सभासदाचे नाव ः श्री/श्रीमती** ______________________

**भनिनि क्रमांक** ______________________

# महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी सहकारी पतसंस्था (मर्यादित), मुंबई

## सहकार खात्यकडून मंजूर मध्य-मुदत कर्जाची सारणी

| मासिक वेतन | कर्ज कमाल मर्यादा | कर्ज करार पत्राची किंमत (रू.) | सर्विस चार्ज (रू.) | आवश्यक जामीनदाराची संख्या |
|---|---|---|---|---|
| रू २०,०००/- पर्यत | रू. ५,००,०००/- | १०० | २०० | एक |
| रू.२०,००१/- चे वर ते रू.२५,०००/- पर्यत | रू. ६,००,०००/- | २०० | २०० | दोन |
| रू.२५,००१/- चे वर ते रू.३०,०००/- पर्यत | रू. ७,५०,०००/- | २०० | २०० | दोन |
| रू.३०,००१/- चे वर ते रू.३५,०००/- पर्यत | रू. ९,००,०००/- | २०० | २०० | दोन |
| रू.३५,००१/- चे वर ते रू.४०,०००/- पर्यत | रू.१०,५०,०००/- | ३०० | २०० | तीन |
| रू.४०,००१/- चे वर ते रू.४५,०००/- पर्यत | रू.१२,००,०००/- | ३०० | २०० | तीन |
| रू.४५,००१/- चे वर ते रू.५०,०००/- पर्यत | रू.१३,५०,०००/- | ३०० | २०० | तीन |
| रू.५०,००१/- चे वर ते रू.५५,०००/- पर्यत | रू.१५,००,०००/- | ३०० | ५०० | तीन |
| रू.५५,००१/- चे वर ते रू.६०,०००/- पर्यत | रू.१६,५०,०००/- | ३०० | ५०० | तीन |
| रू.६०,००१/- चे वर ते रू.७०,०००/- पर्यत | रू.१८,००,०००/- | ३०० | ५०० | तीन |
| रू.७०,००१/- चे वर ते रू.८०,०००/- पर्यत | रू.२१,००,०००/- | ३०० | ५०० | चार |
| रू.८०,००१/- चे वर ते रू.९०,०००/- पर्यत | रू.२४,००,०००/- | ३०० | ५०० | चार |
| रू.९०,००१/- चे वर ते रू.१,००,०००/- पर्यत | रू.२५,००,०००/- | ३०० | ५०० | चार |
| रू.१,००,००१/- च्या वरील | रू.३०,००,०००/- | ३०० | ५०० | चार |

(**परतफेड** ः- जास्तीत जास्त २४० समान मासिक हप्त्यांत व शिल्लक सेवानिवृत्ती कार्यकाळास अधीन राहून सेवानिवृत्तीस शिल्लक कालावधी यापैकी जो कमी असेल तो कालावधी.मध्य-मुदत कर्ज व्याजदर @१०%)

## <u>तातडीचे कर्जाची सारणी</u>

| मासिक वेतन | कर्ज मर्यादा | सर्विस चार्ज |
|---|---|---|
| रू. ५०,०००/- पर्यत | रू.३०,०००/- | १०० |
| रू. ५०,००१/- ते रू.१,००,०००/- | रू.६०,०००/- | १०० |
| रू.१,००,००१/- च्या वरील | रू.८०,०००/- | १०० |

(**परतफेड** ः- जास्तीत जास्त १२ समान मासिक हप्त्यांत कर्जास व्याजदर @८.५%)

( **टिप** ः सभासदास तातडीचे कर्ज व मध्य-मुदत कर्ज मिळुन मध्यमुदत कर्जाच्या सारणीमध्ये दर्शविलेल्या कमाल मर्यादेपेक्षा अधिक कर्ज मिळणार नाही.पतसंस्थेची मध्य-मुदत कर्ज मर्यादा कमाल ३० लाख रूपये इतकीच आहे.)